वाचले :- १) आदेश क्र.ई-गव्हर्नन्स/२/कावि/४६३/२०१४ दि. ४/८/२०१४
२) श्रीम. संजना संदिप सोनावणे यांचा दि.३०/१/२०१५ चा अर्ज
३) मा. आयुक्त सो. यांचा दि. ३१/ ०१ /२०१५ चा मान्य प्रस्ताव

==================================================

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नागरी सुविधा केंद्र
क्र.नासुके/१/कावि/४०/२०१५
दिनांक :- २ / २ /२०१५

**विषय :- अ क्षेत्रीय कार्यालयामधील नागरी सुविधा केंद्राचे मुदतवाढीबाबत..**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामधील नागरिकांच्या सोयीसाठी १६ ठिकाणी जाहिरात प्रसिध्द करून खाजगी तत्वावर नागरी सुविधा केंद्रे सुरू केलेली आहेत. मात्र अ आणि फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधून नागरी सुविधा केंद्रासाठी अर्ज प्राप्त न झाल्यामुळे नागरिकांच्या सोयीसाठी आदेश क्र.ई-गव्हर्नन्स/२/कावि/४६३/२०१४ दि. ४/८/२०१४ अन्वये अ क्षेत्रीय कार्यालयालयाच्या तळमजल्यावरील नागरी सुविधा केंद्रामध्ये भाडे तत्वावर जागा उपलब्ध करून खाजगी तत्वावर नागरी सुविधा केंद्र चालविणेकामी ६ महिन्यांसाठी परवानगी देण्यात आलेली आहे. त्याची मुदत दि. ३/२/२०१५ रोजी संपुष्टात येत आहे.

अ आणि फ क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधील नागरिकांच्या सोयीसाठी त्या परिसरामध्ये नागरी सुविधा केंद्राची आवश्यकता आहे. तसेच श्रीम. संजना संदिप सोनावणे यांचे सद्यस्थितीत सुरू असलेल्या अ क्षेत्रीय कार्यालयामधील नागरी सुविधा केंद्रामध्ये खाजगी तत्वावर नागरी सुविधा केंद्रास मुदतवाढ मिळणेकामी वाचले क्र.२ अन्वये विनंती अर्ज सादर केला आहे.

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या आदेशान्वये श्रीम. संजना संदिप सोनावणे यांना उपरोक्त वाचले क्र.१ चे अटी शर्तीनुसार अ क्षेत्रीय कार्यालयाचे तळघरामधील नागरी सुविधा केंद्र चालू ठेवणेकामी पुढील सहा महिन्यांकरिता मुदतवाढ देणेस मान्यता देत आहे.

(राजीव जाधव)
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

प्रति - श्रीम. संजना संदिप सोनावणे
भोसरी, पुणे.

प्रत :- १) भूमी आणि जिंदगी विभाग मुख्य कार्यालय
२) अ क्षेत्रीय कार्यालय, भूमी आणि जिंदगी
३) लेखा विभाग
४) ई-गव्हर्नन्स विभाग

**प्रशासन अधिकारी (ना.सु.कें.)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८